# थांब ना रे पावसा



थांब ना रे पावसा, किती सांडशील तू?
पूर-पाणी धावताना, काय रे नेशील तू?
आम्हीच देतो साद तुला, ऋतुच्या दिसता खुणा
कौतुके मोती थेंबांचे, तळहाती झेलतो पुन्हा
रौद्र तरी हे असे, किती खेळशील तू?
थांब ना रे पावसा, किती सांडशील तू?
पूर-पाणी धावताना, काय रे नेशील तू?
झडझडून पडताना, ना कशाची करतो तमा
वाहून जाता घर आमुचे, का करावी तुज क्षमा?
नेमक्याने बरसण्याचे, काय रे घेशील तू?
थांब ना रे पावसा, किती सांडशील तू?
पूर-पाणी धावताना, काय रे नेशील तू?
रूप हे असे तुझे, पाहतो आम्ही तरी
राखूनी ठेवितो, प्रेम तुझ्यावर अंतरी
या तुझ्या चाहत्यांना, काय रे देशील तू?
थांब ना रे पावसा, किती सांडशील तू?
पूर-पाणी धावताना, सवे काय नेशील तू?
© प्रीती देशपांडे